P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

# प्रेसनोट दिनांक – १६/११/२०२४

## दि. १५/११/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण ८३८/२०२४ भादवि कलम ४१७,४२० सह आय टी अँक्ट ६६(D) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२१/५/२०२४ रोजी स. १०:४५ वा. ते दि.२४/०५/२०२४ रोजी चे दरम्यान आयफेल सिटी, चाकण-तळेगाव रोड, चाकण, ता. खेड, जि.पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१५/११/२०२४ रोजी १८.४६ वा |
| फिर्यादी | :- | राहुल महादेव गानगीर वय ३१ वर्षे, व्यवसाय खाजगी नोकरी, रा. आयफेल सिटी, चाकण-तळेगाव रोड, चाकण, ता. खेड, जि.पुणे, |
| आरोपी | :- | अनोळखी kaylee व arianna पूर्ण नाव पत्ता माहित नाही |
| तपशिल | :- | नमुद केले तारखेस वेळी ठिकाणी फिर्यादीचे व्हाट्सअप मोबाईल नंबर वर अनोळखी इसमाने त्याचे व्हाट्सअप मोबाईल नंबर वरून good morning.hr Arya who just called you.please allow me to introduce you to our part -time jobs असा मेसेज करून अनोळखी इसम यांनी टेलिग्राम डाउनलोड करण्याचे सांगून global working group व vip group मध्ये अॅड करून त्यावर वेगवेगळ्या लिंक पाठवून त्यामधील टास्क करण्याचे सांगून प्रथम फिर्यादीला १००/- रूपये, २१०/- रूपये असे पैसे देऊन फिर्यादीचा विश्वास संपादन करून त्यानंतर परत ऑनलाईन वेगवेगळे प्रकारचे टास्क देऊन ते रेटिंग केल्यास जास्त पैसे मिळतील असे टेलिग्राम आयडीवर मेसेज द्वारे सांगून फिर्यादी यांना वेळोवेळी वरील खात्यावर पैसे भरण्यास प्रवृत्त करून अप्रामाणिकपणे फिर्यादीची एकूण ५,२१,६००/- रूपयाची फसवणूक केली आहे म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोनि घार्गे गुन्हे ९८७०१८८०१८ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | दिघी ५०६/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम १२५(अ), ११५(२),३५२,३५१(२)(३),३(५) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०३/०९/२०२४ रोजी दुपारी १२-०० वा. सुमा. रा.सर्वे नं. ७८/३,दिव्या क्लासेस समोर, संत गजानन महारज नगर, दिघी, ता.हवेली, पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.१५/११/२०२४ रोजी १६.२६ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | चार महिला आरोपी |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी तक्रादार व आरोपीत क्र १, २ हे एकाच इमारतीत राहण्यास असुन त्यांचे इमारतीस एकच जिना असुन ते सर्वजन वापरतात. यातील तक्रारदार यांनी सदर जिन्यामध्ये जेवन सांडवले व जिना खराब केला या कारणाने आरोपीत यांनी तक्रारदार यांना शिवीगाळी, दमदाटी,करुन जिवे मारण्याची धमकी देवून हाताबुक्यानी मारहाण करून जिन्या वरून ढकलुन दिले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा १४०१ टेमकर दिघी ८८५०७८८०३३ |

०३

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी ५४५/२०२४ बी.एन.एस. कलम-१३२, १२१(१),२८१,१२५(अ),३२४(४), सह मो.वा. कायदा कलम १८४, ११९/१७७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१५/११/२०२४ रोजी ००/२५ वा. चे सुमा. भक्ती शक्ती चौक, निगडी पुणे या ठिकाणी सार्वजणीक रोडवर या ठिकाणी |

गुन्हा दाखल :- दि १५/११/२०२४ रोजी १४.३७ वा

फिर्यादी :- संतोष सावळेराम शिंदे पो.शि.ब.नं.४१८६ नेमणुक पोलीस मुख्यालय, पिंपरी पिंपरी चिंचवड

आरोपी :- एम.एच.१२.एच.एन.२४५८ यावरील वाहन चालक नाव पत्ता माहित नाही.

तपशिल :- फिर्यादी हे सध्या आगामी विधानसभा निवडणुक २०२४ बंदोबस्ताचे अनुषंगाने एस एस टी. पथकामध्ये वाहन तपासणीचे सरकारी कर्तव्य दिनांक २२/१०/२०२४ रोजी पासून भक्ती शक्ती चौक, निगडी पुणे येथे करित असताना दिनांक १५/११/२०२४ रोजी रात्री ००/२५ वा. चे सुमारास वाहन तपासणी करण्यासाठी बॅरीकेट लावुन येणारे वाहनांचे तपासणीचे सरकारी कर्तव्य करीत असताना एम.एच.१२.एच. एन.२४५८ या वाहनावरील चालकाने त्याचे ताब्यातील सदरचे वाहन भरधाव वेगात, हयगईने व अविचाराने, वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन चालवित येत असताना सदर वाहनास तपासणी करण्यासाठी फिर्यादी यांनी वाहन थांबविण्याचा हाताने इशारा केला असता फिर्यादी यांनी सरकारी कर्तव्य करू नये या उद्देशाने सदर कार चालकाने त्याचे ताब्यातील कार न थांबाविता फिर्यादी यांचेसमोर असणारे बॅरीकेटला धडक देवून फिर्यादीस बॅरीकेटसह रोडवर २० फुटापर्यंत फरफटत नेऊन तसेच एस एस टी पथक प्रमुख श्याम पंढरीनाथ लोणारकर यांना जखमी करुन सरकारी बॅरीकेट तोडुन नुकसान करुन सरकारी कामात आडथळा निर्माण करुन आपघाताचे ठिकाणाहुन पळुन गेला आहे. म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि यलमार ९४२३२३९९४३

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- पिंपरी १०४२/२०२४भारतीय न्याय संहीता २८१, १२५ (ए) मोटार वाहन कायदा कलम १८४, ११९/१७७ प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. १४/११/२०२४ रोजी रात्रौ २३.४५ वा. चे सुमा. जुना मुंबई पुणे हायवे मोरवाडी येथील पंक्चर येथे.

गुन्हा दाखल :- दि. १५/११/२०२४ रोजी ०६/०९ वा.

फिर्यादी :- मनिष काशीनाथ भालेराव वय- ३५ वर्षे, व्यवसाय- नोकरी, रा. सर्व्हे नं. २६, भारत कॉलनी, माने स्कुलजवळ, नढे नगर, काळेवाडी, पुणे

आरोपी :- एस टी नं. एम एच १४ एल बी ०४७८ वरील चालक.

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांचे सासु सासरे यांच्यासह टु व्हिलरने घरी जात असताना जुना मुंबई पुणे हायवे मोरवाडी येथील पंक्चर येथुन एस टी नं. एम एच १४ एल बी ०४७८ वरील चालक याने वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करुन, बेदरकारपणे वाहन चालवुन ओव्हरटेक करीत असताना फिर्यादी यांच्या सासरे यांच्या गाडीला हॅडलला कट लागुन ते रस्त्याच्या उजव्या बाजुला खाली पडुन त्यांना डोक्याला उजव्या बाजुला व उजव्या खांदयाला जखमी केले तसेच त्यांच्यासोबत फिर्यादी यांची सासु जयश्री हीस उजव्या खांदयाला व दिक्षा हीस मुका मार लागुन जखमी केले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा जगताप ९५५२१७६७६७

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- दापोडी ७५३/२०२४ महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम कलम ६५(अ)(ई) प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१५/११/२०२४ रोजी १३.४० वा. चे. सुमा. शंकर मदीराजवळ शास्त्री नगर कासारवाडी रोड लगत, पुणे

गुन्हा दाखल :- दि.१५/११/२०२४ रोजी १९.२८ वा

फिर्यादी :- आशिष ज्ञानदेव बनकर पोलीस हवा १४५८, नेमणुक मालमत्ता गुन्हे विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड.

आरोपी :- अशोक नाना भिसे वय २१ वर्षे रा. तरवडे वस्ती, गौतम बजणे यांची खोली, महमंदवाडी, हडपसर पुणे.

तपशिल :- नमूद तारीख वेळी व ठिकाणी आरोपीत याने पिकअप गाडी क्र एमएच/१४/एचयु/८९३९ या मध्ये वेगवेगळया कंपन्यांची विदेशी दारूच्या बाटल्या असा एकुण ०५,१८,२४०/- रु किंमतीचा प्रोव्हीबिशन माल बेकायदेशिररित्या अनाधिकाराने, विनापरवाना विक्री करण्याकरीता वाहतुक करताना जवळ बाळगला असताना मिळुन आला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पो हवा १०१७ सोनवणे

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- महाळुंगे एमआयडीसी ७८७ /२०२४ एन.डी.पी.एस.ॲक्ट कलम ८(क) २० (ब) (ii) (ब)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१५/११/२०२४ रोजी २०/५० वा. अझाद गॅरेज या पत्र्याचे शेडमध्ये, डिकेचौक, कुरुळी ताखेड जि पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.१५/११/२०२४ रोजी २३ / १४ वा

फिर्यादी :- संतोष दशरथ वायकर, पोलीस शिपाई बक्कलनंबर- २२५५, महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन, पिंपरीचिंचवड पोलीस आयुक्तालय

आरोपी :- मायाकौर किशोरसिंग तिलपीते, वय ४२ वर्षे, रा.अझादसिंग यांचे गॅरेजमध्ये, डिकेचौक, कुरुळी ताखेड जि पुणे **समजपत्र देण्यात आले आहे.**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी महिला आरोपी हिने स्वतःचे कब्जात एकुण ४२,३००/- रुपये किंमतीचा ८४६ ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ बेकायदेशिरपणे बाळगुन त्याचे विक्री करीत असताना मिळुन आली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि कुथे ७०२१७१३३७६

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- हिंजवडी (बावधन) १३२२/२०२४ भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२५ (ब),३२४ (३), मो.वा.का.क. १३२(१)(क),१८४,११९/१७७ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१३/११/२०२४ रोजी २२/०० वा. सुमा सुस पाषाण रोड, सुस स्मशानभुमी, सीएनजी पेट्रोल पंपाजवळ, सुस ता. मुळशी जि.पुणे

गुन्हा दाखल :- दि. १५/११/२०२४ रोजी २२.२१ वा.

फिर्यादी :- लखोप्पा नुरप्पा राठोड वय ३५ वर्षे रा.गल्ली नंबर ८, गणराज बिल्डींग,ग्राऊन्ड फ्लोर, मोहमदवाडी ए पार्क हाडपसर पुणे

आरोपी :- रॉयल इन्फील्ड क्लासिक ३५० बुलेट मोटार सायकल नंबर एम एच १० डी वाय ६२१६ वरील चालक नाव पत्ता माहीत नाही.

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी एक बुलेट मोटार सायकल चालक त्याचे पुढील वाहनाला ओव्हरटेक करुन फिर्यादी जात असलेल्या लेनमध्ये येऊन फिर्यादी यांचे मोटार सायकलला धडक दिली त्यामुळे फिर्यादी हे मोटार सायकल वरुन खाली पडले त्यात त्यांचे उजवे पायाला जखम झाली. त्यांचे मोटार सायकलचेही नुकसान झाले तसेच फिर्यादी यांना हॉस्पीटल मध्ये ॲडमीट केले. तेथे डॉक्टरांनी त्यांचे पायाचा एक्सरे काढला असता, त्यांचा उजवा पाय नडगीमध्ये मोडला (फॅक्चर) असल्याचे डॉक्टरांनी सांगीतले. म्हणुन रॉयल इन्फील्ड क्लासिक ३५० बुलेट वरील चालकाने त्याची मोटार सायकल ही हायगयीईने, अविचारने, भरधाव वेगात, बेदरकारपणे, वाहतुकीच्या नियमाकडे दुर्लक्ष करुन चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला धडक देवुन फिर्यादीच्या उजवे पायाचे नडगीस फॅक्चर करुन गंभीर जखमी केले तसेच फिर्यादीचे मोटार सायकलचे नुकसान करणेस करणीभुत झाला. तसे तेथे न थांबता निघुन गेला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- मपोउपनि जाधव